# <u>नियमित दिवाणी दावा क्र.६६/२०१५ मधील निशाणी क्रमांक ६२ वरील आदेश</u>

जगन्नाथ शेंबडे व इतर. वि. मारुती शेंबडे व इतर.

**CNRNO.MHSN070005532015**

प्रस्तुतचा अर्ज वादींनी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चे आदेश ६ नियम १७ प्रमाणे वादपत्र दुरुस्त करणेसाठी दाखल केला आहे.

०२. प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी व जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना वादी क्र. १ जगन्नाथ तुळीशीराम शेंबडे यांनी वादमिळकतीपैकी त्याचे मालकी वहिवाटीचे क्षेत्राबाबत दि. ०७.१२.२०२१ रोजी वादी क्र. ३ विजय विठठल शेंबडे यांचे नांवे बक्षीसपत्र करुन दिले असून त्याबाबत वादीने अर्ज करुन विजय विठठल शेंबडे याना वादी म्हणून सामील करणेबाबत तसेच त्याा अनुषंगाने दुरुस्तीसाठी अर्ज देवून त्याप्रमाणे दुरुस्ती केल्या आहेत. सदरील अर्जामध्ये वादीने बक्षीसपत्राची तारीख नमूद केली आहे परंतु दुरुस्तीच्या मजकुरामध्ये टायपिंग दोषाने सदर बक्षीसपत्राची तारीख नमूद करणेचे राहून गेले आहे व सदर चुक लक्षात न आलेने तसेच राहून गेले आहे. त्यामुळे दाव्याकामी तांत्रीक दोष राहू नये म्हणून दावा कलम २अ मध्ये तिसरी ओळीचे शेवटी नोंद बक्षीसपत्र वादी नं.३ यास या मजकुरानंतर ' दि. ०७.१२.२०२१ रोजी' असा मजकूर लिहिणेत यावा.

०३. वादी यांनी पुढे असे कथन केले आहे की, सदरची दुरुस्ती ही केवळ टायपिंग दोषाने व नजरचुकीने झाली असून सदरची बाब वादींनी त्यांचे पूर्वीच्या अर्जामध्ये नमूद केली आहे. सदरच्या दुरुस्तीमुळे दाव्यात स्पष्टता येणार आहे. दाव्याकामी अदयाप पुरावा सुरु झालेला नाही. त्यामुळे उपरोक्तप्रमाणे दुरुस्ती अर्ज मंजूर होण्याची त्यांनी विनंती केली.

०४. प्रस्तुत अर्जास प्रतिवादींनी नि.क्र. ६४ वर अर्जास म्हणणे देवून प्रस्तुतच्या अर्जास विरोध दर्शविला. त्यांनी कथन केले की प्रस्तुतचा दावा सन २०१५ साली दाखल असून दावा प्रलंबित ठेवण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केलेला आहे. प्रस्तावित दुरुस्तीनेदाव्यामध्ये गुंतागुंत निर्माण होणार आहे. वादी प्रस्तुत प्रकरणात पुरावा सादर न करता अशाप्रकारचे वेगवेगळे अर्ज सादर करीत आहे. प्रतिवादींना त्रास

देण्यासाठी प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला असल्याने अर्ज खर्चासह नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादींनी केलेली आहे.

०५. दोनही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्ज, अभिलेखावरील कागदपत्रे व युक्तीवाद ऐकता खालील विचाराधीन बाबी माझ्या विचारार्थ निघतात. त्यावरील निष्कर्ष हे मी त्यापूढे नोंदवलेल्या कारणमिमांसेसह नोंदवित आहे.

| **अ.क.** | **विचाराधीन बाबी** | **निष्कर्ष.** |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती वादाचे निरसरन करण्याकामी आवश्यक आहे काय ? | होकारार्थी. |
| २ | प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याचे स्वरुप बदलते काय ? | नकारार्थी. |
| ३ | आदेश काय? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

कारणमिमांसा.

**विचाराधीन बाब क्र. १ व २ करीता**

०६. सदरच्या बाबी ऐकमेकांशी संलग्नीत असल्यामुळे व कथनांची पुनरावृत्ती टाळण्याकरीता कारणमिमांसेकरीता एकत्रीत घेण्यात येत आहे.

०७. वर नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुतचा दावा निरंतर मनाईसाठी व जाहीर होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे. वादीने यापूर्वी दुरुस्ती करुन बक्षीसपत्राबाबतचा मजकूर वादपत्रामध्ये समाविष्ट केलेला आहे. परंतु नजरचुकीने बक्षीसपत्राची तारीख नमूद करण्याचे राहून गेले असे वादीने कथन केले आहे. प्रस्तावित दुरुस्ती किरकोळ स्वरुपाची असून वादाचे निरसरन करण्यासाठी व दावा गुणदोषावर निकाली होण्यास दुरुस्तीची आवश्यकता आहे.

०८. प्रस्तावित दुरुस्तीमुळे कोणत्याही मान्य केलेल्या बाबींवर परिणाम होत नाही. तसेच प्रस्तुतच्या अर्जास विलंबाची बाधा येत नाही. प्रस्तावित दुरुस्ती कायदेशिर असल्याने ती मंजूर झाल्यास प्रतिवादींना कोणतेही नुकसान पोहोचत नाही.

प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुपामध्ये कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी प्रस्तावित दुरुस्ती वादाचे निरसरन करण्यासाठी अत्यावश्यक आहे.

०९. वरील सर्व कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की प्रस्तावित दुरुस्ती वादाचे निरसरन करणे कामी अत्यावश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलत नाही. तसेच प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींना कोणतेही नुकसान होत नाही. करीता विचाराधीन बाब क्र. १ वरील निष्कर्ष मी होकारार्थी व विचाराधीन बाब क्र. २ वरील निष्कर्ष मी नकारार्थी नोंदवित आहे.

**विचाराधीन बाब क्र. ३ करिता**

१०. वरील कारणांवरुन मी या निष्कर्षापर्यंत येतो की, प्रस्तावित दुरुस्ती वादाचे निरसरन करणे कामी आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. करीता प्रस्तुतचा अर्ज मंजूर करणे उचित ठरते. वरील कारणांवरुन विचाराधीन बाब क्र. ३ करीता मी खालील आदेश पारित करतो–

**आदेश**

१. नि.क्र. ६२ वरील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. नि.क्र. ६२ वरील अर्जान्वये प्रस्तावित दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी असे वादींना आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

ARUN RAGHUNATH VYAWAHARE

Digitally signed by ARUN RAGHUNATH VYAWAHARE
Date: 2024.09.04 07:14:08 +0530

(अरुण र. व्यवहारे)

दिनांक ०३.०९.२०२४ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर कवठेमहांकाळ

Certificate

I affirm that the contents of this P.D.F. file order are same, word to word, as per the original order.

Name of the Stenographer - H.P.Haridas
Court - CJJD and JMFC, Kavathemahankal.
Date - 3.09.2024
Order signed by the
Presiding Officer on -3.09.2024
Order uploaded on -4.09.2024